WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शुक्रवार , 18 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 128 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे



## ज्येष्ठ छायाचित्रकार तुकाराम कर्वे यांच्या छायाचित्रांचे MIT-ADT विद्यापीठातील प्रदर्शन ठरले लक्षवेधी

**पुणे : वृत्तसंस्था**

जागतिक छायाचित्रण दिनाचे औचित्य साधून MIT-ADT विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फाईन आर्ट्स अँड अप्लाइड आर्ट्सच्या वतीने ज्येष्ठ छायाचित्रकार व सर्जनशील क्षेत्रातील अनुभवी व्यावसायिक श्री. तुकाराम कर्वे यांच्या निवडक छायाचित्रांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

परळी शहरा नजीकच्या साळुंकेवाडी-घटनांदूर येथील मूळ रहिवासी आणि वैद्यनाथ विद्यालय, परळी वैजनाथ येथील माजी विद्यार्थी असलेल्या श्री. तुका कर्वे यांनी ब्रँडिंग, पॅकेजिंग डिझाइन, प्री-मीडिया, प्रिंटिंग तंत्रज्ञान आणि फोटोग्राफी या क्षेत्रांत ३७ वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय व्यावसायिक अनुभव मिळविला आहे. Applied Art, Printing Technology आणि Photography या विषयांतील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि सर्जनशील योगदान या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना तसेच कला व छायाचित्रण क्षेत्रातील रसिकांना अनुभवता आले.

MIT School of Fine Arts & Applied Arts, MIT-ADT University, पुणे येथे आयोजित या प्रदर्शनाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि कला-छायाचित्रण क्षेत्रातील रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रसंगी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबईचे कुलगुरू श्री. हेम चॅटर्जी यांच्या हस्ते श्री. तुकाराम कर्वे यांचा त्यांच्या प्रदीर्घ व्यावसायिक व सर्जनशील योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. हा सोहळा मा. प्रा. डॉ. मंगेश तु. कराड (कार्यकारी अध्यक्ष व प्र-कुलपती), सौ. ज्योती ढाकणे (विश्वस्त MAEERS, कार्यकारी संचालक), प्रा. डॉ. राजेश एस (कुलगुरू,), प्रा. डॉ. महेश चोपडे (कुलसचिव), प्रा. डॉ. नचिकेत ठाकूर (प्र-कुलगुरू) आणि प्रा. डॉ. गणेश तरतरे (डीन) यांच्या उपस्तिथीत पार पडला.


श्री. तुकाराम कर्वे यांच्या छायाचित्रणातील अनुभवाचा आणि त्यांच्या कलाकृतींचा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व अभ्यासपूर्ण अनुभव मिळाल्याचे यावेळी उपस्थितांनी आवर्जून नमूद केले.

## परळीत रेल्वे पोलीस व RPF कडून धावत्या ट्रेनमध्ये जनजागृती

**परळी (प्रतिनिधी)**

गणेशोत्सव व मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लोह मार्ग पोलीस स्टेशन परळी वै. आणि RPF परळी यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष डोमिनेशन व जनजागृती मोहीम राबविण्यात आली. पूर्णा–हैदराबाद धावत्या रेल्वेतील प्रत्येक डब्यात पोलिसांनी प्रवाशांना मोबाईल चोरी, बॅग लिफ्टिंग, अमली पदार्थ व प्रतिबंधित मालाची वाहतूक याबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले.

प्रवाशांनी मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, अनोळखी व्यक्तींकडून खाद्यपदार्थ घेऊ नयेत आणि संशयास्पद हालचाल आढळल्यास 139 किंवा 112 वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक जोगदंड, निरीक्षक कांबळे, PSI फड, PSI काळे यांच्यासह कांबळे, खडके, सुरनर, पवार, टिमकीकर , ढाकणे, चव्हाण , बिक्कड, नरटे, RPF ASI लांडगे, शेख, दवणे, अमित कुमार व प्रिती सिंह यांनी सहभाग घेतला. पोलिसांच्या या उपक्रमाचे प्रवाशांकडून स्वागत करण्यात आले.



## कै . लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मराठवाडा मुक्ति संग्राम दिन सोहळा उत्साहात संपन्न

### स्वामी रामानंदतीर्थ हे मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याचे समर्थ योद्धे : प्रा. रमेश सोनवळकर यांचे प्रतिपादन

**परळी वार्ताहर**

येथील कै . लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने मराठवाडा मुक्ति संग्राम दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला .

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. संजय देशमुख लाभले . तसेच संस्था सचिव मा. श्री रवींद्र देशमुख, कोषाध्यक्ष प्रा . प्रसादजी देशमुख, संस्थेच्या संचालिका तथा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे व संस्थेच्या संचालिका मा . सौ छायाताई देशमुख यांचीही प्रमुख उपस्थिती होती .

या शुभप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले . या सोहळ्या प्रसंगी पवित्र अशा तिरंगाध्वजाचे आरोहण संस्थेचे सचिव मा . रवींद्रजी देशमुख यांच्या शुभहस्ते संपन्न झाले . या शुभकाळी कु . योगेश्वरी पोखरकर व कु. स्नेहा हमिने या विद्यार्थिनींनी केलेल्या मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याची माहिती देणाऱ्या भित्तिपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .



या वेळी मराठवाडा विकास पत्रिकेचे अनावरणही करण्यात आले . या प्रसंगाचे औचित्य साधून डॉ. आसेगांवकर यांनी स्वरचित कवितेचे वाचन केले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा . प्रसाद देशमुख यांनी केले तर - प्रमुख वक्ते प्रा. रमेश सोनवळकर यांनी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या अभ्यासपूर्ण वक्तव्यात मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यांतील स्वामी रामानंदतीर्थ यांची भूमिका , त्यांच्या शैक्षणिक सामाजिक व राष्ट्रवादी कार्याचे समग्र वैभव सांगून राष्ट्रवादी मुस्लिम स्वातंत्र्यसैनिकांच्याही कार्याचे स्वरूप सांगितले व या स्वातंत्र्यलढ्याचा सविस्तर आढावा घेतला . यानंतर संस्थेचे सचिव मा रवींद्र देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप केला प्रारंभी प्रा. सोनवळकर सरांचा परिचय रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ विवेकानंद कवडे यांनी करून दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पा.डॉ अरुण चव्हाण यांनी केले तर प्रा.डॉ पंढरी गुट्टे यांनी आभार मानले . या क्रार्यक्रमास महाविद्यालयातील तसेच रमाई शिक्षण संस्थेचे सर्व शिक्षक - शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी समूह मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता .

## बी.फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा

**अंबाजोगाई प्रतिनिधी:-**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी.फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात आणि देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस) विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात सकाळी ८ वाजता झाली. उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी भूषविले. ध्वजवंदन बी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रकाश टाकत स्वातंत्र्य सैनिकांच्या



योगदानाचे स्मरण करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ.संतोष तरके यांनी सांगितले की, मराठवाडा मुक्तिसंग्राम हा केवळ लढा नव्हता, तर तो स्वाभिमानाचा आणि स्वातंत्र्याच्या मौल्यवान मूल्यांचा अभिमानाने केलेला उद्घोष होता. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या विषयावर आधारित देशभक्तिपर गीत, नृत्य आणि कविता सादर करून स्वातंत्र्यवीरांना आदरांजली वाहिली. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणातून देशप्रेम, त्याग, बलिदान, सामाजिक न्याय आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी परळी पंचायत समिती येथे 'बोंब मारो' आंदोलनाची चर्चा !

**परळी (प्रतिनिधी)**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर परळी पंचायत समिती कार्यालयासमोर रेवली ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणी संबंधित अधिकारी व दोषींवर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आंदोलकांनी 'बोंब मारो' आंदोलन केले.

रेवली ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराची चौकशी करून संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. यावेळी घोषणाबाजी करत आंदोलकांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आंदोलनाच्या वेळी आंदोलक आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (BDO) यांच्यात काही मुद्द्यांवरून जोरदार बाचाबाची झाली. त्यामुळे पंचायत समिती परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणाची प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून भ्रष्टाचारातील दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.



- परळी तालुक्यातील रेवली ग्रामपंचायत भ्रष्टाचार प्रकरणी परळीत बोंब मारो आंदोलन
- आंदोलक आणि गटविकास अधिकारी यांच्यात बाचाबाची

# टिम डेव्हिडला मोठा दणका! पंचांच्या दिशेने बर्फाची पिशवी फेकणं पडलं महागात; सामना शुल्काच्या 50% दंड

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा स्फोटक फलंदाज टिम डेव्हिड चर्चेत आला आहे. मात्र यावेळी त्याच्या फलंदाजीमुळे नव्हे, तर मैदानावरील गैरवर्तनामुळे त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात आली आहे. आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी टिम डेव्हिडवर त्याच्या सामना शुल्काच्या ५० टक्के दंडाची कारवाई करण्यात आली असून त्याच्या खात्यात दोन डिमेरिट पॉइंट्सही जमा करण्यात आले आहेत.

अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात आरसीबी आणि गुजरात टायटन्स आमनेसामने होते. या हाय-व्होल्टेज सामन्यादरम्यान घडलेल्या एका घटनेमुळे डेव्हिडला मोठी किंमत मोजावी लागली आहे.

## नेमकं काय घडलं ?

सामन्याच्या पहिल्या डावातील दहाव्या षटकात आरसीबीची महत्त्वाची विकेट पडली. संघावर दबाव वाढलेला असताना डगआउटमध्ये बसलेल्या टिम डेव्हिडने संतापाच्या भरात बर्फाची पिशवी जोरात फेकली. ही पिशवी पंच नितीन मेनन यांच्या दिशेने गेल्याचे सामनाधिकारींच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या कृतीला आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.९ अंतर्गत गंभीर उल्लंघन मानण्यात आले. या कलमानुसार सामन्यादरम्यान खेळाडू, पंच, सामनाधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या दिशेने क्रिकेट साहित्य अथवा इतर वस्तू अयोग्य किंवा धोकादायक पद्धतीने फेकणे हा दंडनीय गुन्हा आहे.

### RCBच्या विजयानंतरही चर्चेत डेव्हिड :

■ आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात आरसीबीने ऐतिहासिक कामगिरी करत विजेतेपद पटकावले. मात्र या आनंदोत्सवानंतर टिम डेव्हिडच्या शिस्तभंगाच्या घटनेने क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. मैदानावरील भावना नियंत्रणात ठेवण्याचे महत्त्व या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आरसीबीच्या विजयानंतर संघाचे यश चर्चेत असतानाच टिम डेव्हिडवरील कारवाई ही अंतिम सामन्यानंतरची सर्वाधिक चर्चेची बाब ठरली आहे.




### आरोप मान्य, शिक्षाही स्वीकारली :

■ या प्रकरणाची सुनावणी सामनाधिकारी आणि माजी भारतीय क्रिकेटपटू जवागल श्रीनाथ यांनी केली. टिम डेव्हिडने आपल्यावरील आरोप मान्य केले असून त्याने शिक्षेविरोधात कोणताही आक्षेप नोंदवला नाही. त्यामुळे त्याच्यावर ५० टक्के सामना शुल्क दंड आणि दोन डिमेरिट पॉइंट्सची कारवाई करण्यात आली.

### पुढील हंगामात बसू शकतो फटका

■ आयपीएलच्या शिस्तभंग नियमांनुसार एखाद्या खेळाडूच्या खात्यात एकूण पाच डिमेरिट पॉइंट्स जमा झाल्यास त्याच्यावर एका सामन्याची बंदी लागू शकते. टिम डेव्हिडच्या खात्यात आता दोन डिमेरिट पॉइंट्स जमा झाले आहेत. भविष्यात आणखी अशाच प्रकारचे उल्लंघन झाल्यास त्याला निलंबनाचा सामना करावा लागू शकतो. याशिवाय, स्पर्धेच्या नियमांनुसार काही शिस्तभंग कारवायांचा परिणाम पुढील हंगामावरही होऊ शकतो. त्यामुळे आयपीएल २०२७ मध्ये टिम डेव्हिड ज्या फ्रँचायझीकडून खेळेल.

# सूर्यकुमार यादवला डच्चू देणार, T20 क्रिकेटसाठी नवा कर्णधार शोधणार ?




■ मुंबई : वृत्तसंस्था

बीसीसीआयची निवड समिती आंतरराष्ट्रीय टी ट्वेंटी क्रिकेटमधून सूर्यकुमार यादवला कायमचा डच्चू देण्याचा विचार करत आहे. फक्त कर्णधार पदासाठी नाही तर संघात खेळाडू म्हणूनही सूर्यकुमार यादवचा विचार करू नये असा एक मतप्रवाह निवड समितीमध्ये आहे. अंतिम निर्णय लवकरच जाहीर केला जाणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

आयपीएलचा अंतिम सामना ३१ मे २०२६ रोजी झाला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने सलग दुसऱ्यांदा आयपीएल जिंकली. आता एकदम २६ जून रोजी भारतीय खेळाडू टी ट्वेंटी क्रिकेट खेळताना दिसणार आहेत. दोन टी ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २६ जूनला आणि दुसरा २८ जूनला होणार आहे. बेलफास्ट येथे भारत विरुद्ध आयर्लंड असे दोन सामने होणार आहेत. या सामन्यांसाठी अद्याप भारतीय संघाची निवड झालेली नाही. पण आधीच सूर्यकुमार यादव संदर्भात धक्कादायक वृत्त सूत्रांकडून समजले आहे.

मुंबई इंडियन्सकडून खेळलेल्या सूर्यकुमार यादवने आयपीएल २०२६ मध्ये १३ सामन्यांमध्ये २०.७७ च्या सरासरीने आणि १४७.५४ च्या स्ट्राइक रेटने २७० धावा केल्या. त्याच्या फॉर्ममधील घसरणीची गंभीर दखल निवड समितीने घेतल्याचे समजते. मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाने १६.३५ कोटी रुपये मोजून सूर्यकुमार यादवला संघात कायम ठेवले होते. पण २०२६ च्या हंगामात त्याची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही.

भारताने मार्च २०२६ मध्ये सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात तिसऱ्यांदा टी ट्वेंटी वर्ल्ड कप जिंकला. पण त्याची वैयक्तिक कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. आयपीएलमध्येही तो चमकदार कामगिरी करण्यात अपयशी ठरला. ऐन पस्तिशीत असलेल्या सूर्यकुमार यादवच्या कामगिरीत अनपेक्षित अशी घसरण झाली आहे. याच कारणामुळे बीसीसीआयची निवड समिती आंतरराष्ट्रीय टी ट्वेंटी क्रिकेटमधून सूर्यकुमार यादवला कायमचा डच्चू देण्याचा विचार करत आहे.

# फिफा विश्वचषक २०२६: मैदानावर भारतीय वंशाच्या खेळाडूंचा दबदबा

फुटबॉलच्या महाकुंभात, म्हणजेच २०२६ फिफा विश्वचषकात केवळ देशच एकमेकांविरुद्ध लढत नाहीत, तर विविध संस्कृतींचा संगमही पाहायला मिळत आहे. या स्पर्धेत भारताचा संघ नसला, तरी भारतीय वंशाचे चार प्रतिभावान खेळाडू आपापल्या देशांचे प्रतिनिधित्व करत आहेत, ही भारतीय फुटबॉल चाहत्यांसाठी अभिमानाची बाब आहे. हे खेळाडू जागतिक स्तरावर भारताची ओळख अधोरेखित करत आहेत.




**मेक्सिको सिटी : फुटबॉल विश्वातील सर्वात मोठी स्पर्धा असलेल्या फिफा वर्ल्ड कप २०२६ च्या तयारीने आता वेग घेतला आहे. या स्पर्धेने इतिहासातील अनेक विक्रम ...**

- सारप्रीत सिंग (न्युझीलंड): २७ वर्षीय सारप्रीत सिंग हा पंजाबी वंशाचा अॅटॅकिंग मिडफिल्डर आहे. त्याची कारकीर्द अत्यंत प्रेरणादायी आहे. जर्मनीच्या दिग्गज 'बायर्न म्युनिक' क्लबकडून खेळणारा तो पहिला भारतीय वंशाचा खेळाडू ठरला होता. दुखापतीतून सावरून पुन्हा मैदानावर परतलेला सारप्रीत न्युझीलंडच्या आक्रमणाला धार देत आहे.
- ताहसिन मोहम्मद जमशेद (कतार): मूळचा केरळमधील कन्नूरचा असलेला १९ वर्षीय ताहसिन मोहम्मद कतारच्या राष्ट्रीय संघाकडून खेळत आहे. अत्यंत तरुण वयात मिळालेली ही संधी त्याच्यातील कौशल्याची साक्ष देते. विंगर म्हणून खेळताना त्याने कतारच्या संघात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. मल्याळी कुटुंबातून येऊन कतारसारख्या देशाचे प्रतिनिधित्व करणे, ही त्याच्या संघर्षाची मोठी यशोगाथा आहे.
- निशान वेलुपिल्वई (ऑस्ट्रेलिया): ऑस्ट्रेलियाच्या २६-सदस्यीय संघात स्थान मिळवलेला निशान वेलुपिल्वई मूळचा तमिळनाडूचा आहे. वेगवान विंगर म्हणून त्याने ऑस्ट्रेलियन फुटबॉल लीगमध्ये (A-League) आपली छाप पाडली आहे. विश्वचषकासारख्या मोठ्या व्यासपीठावर तमिळ मुळाचा हा खेळाडू देशाचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सज्ज आहे.
- सॅम्युअल मुटुसामी (डीआर काँगो): सॅम्युअल मुटुसामी हे नाव डीआर काँगोच्या संघासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचे भारतीय कनेक्शन फ्रान्समधील त्याच्या कौटुंबिक मुळांशी जोडलेले आहे. मिडफिल्डमध्ये चेंडूवर ताबा राखण्यात आणि बचाव फळीला बळकटी देण्यात तो निपुण आहे.

### फुटबॉल जगतातील नवी पहाट

■ हे चारही खेळाडू केवळ आपापल्या देशांचे प्रतिनिधित्व करत नाहीत, तर ते जगभरातील भारतीय वंशाच्या खेळाडूंसाठी एक प्रेरणास्थान बनले आहेत. जरी भारताचा संघ अद्याप विश्वचषकापासून दूर असला, तरी या खेळाडूंमुळे भारतीय चाहत्यांचे या स्पर्धेतील आकर्षण वाढले आहे. जागतिक फुटबॉलमध्ये भारतीय प्रतिभेला मिळणारी ही मान्यता भविष्यात भारतीय फुटबॉलला नव्या उंचीवर नेण्यास मदत करेल, यात शंका नाही. ही स्पर्धा या खेळाडूंसाठी केवळ एक खेळ नसून, आपली जिद्द आणि कौशल्य जगासमोर सिद्ध करण्याची एक सुवर्णसंधी आहे.

# अवघ्या 5 चेंडूत सामना संपला! महिला टी-20 क्रिकेटमध्ये UAE चा विक्रमी विजय;सौदी अरेबियाचा दारुण पराभव

■ मुंबई वृत्तसंस्था

सामन्यात प्रथम फलंदाजी करताना सौदी अरेबियाचा संपूर्ण संघ UAE च्या आक्रमक गोलंदाजीसमोर पूर्णपणे फिका पडला. सुरुवातीच्या षटकांपासूनच विकेट्स पडायला लागल्या त्यामुळे संघाला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. सौदी अरेबियाने निर्धारित षटकांमध्ये केवळ 27 धावा केल्या. विशेष म्हणजे संघातील पाच फलंदाजांना खातेही उघडता आले नाही. त्यामुळे UAE समोर अत्यंत सोपे लक्ष्य उभे राहिले. सुरक्षा कोट्टे,हीना होटचंदानी आणि कर्णधार ईशा ओझा यांनी प्रत्येकी तीन-तीन विकेट्स घेत सौदी अरेबियाच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले.

### फक्त 5 चेंडूंमध्ये लक्ष्य गाठण्याचा विक्रम

■ 28 धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या UAE ने वेळ न दवडता आक्रमक फलंदाजी केली. कर्णधार ईशा ओझा हिने केवळ 5 चेंडूंमध्ये 15 धावांची तुफानी खेळी केली, तर थीर्था सतिश 4 धावांवर नाबाद राहिली. यामुळे UAE ने केवळ 5 चेंडूंमध्ये सामना जिंकत महिला टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील एक अनोखा विक्रम केला. सर्वात जलद लक्ष्य गाठण्याच्या यादीत UAE चौथ्या स्थानावर आली आहे.शिल्लक राहिलेल्या चेंडूंच्या आधारावर हा महिला टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेट इतिहासातील चौथा सर्वात मोठा विजय ठरला आहे. यापूर्वी रवांडा,टांझानिया आणि थायलंड यांनी याहून जलद लक्ष्याचा पाठलाग करत विक्रम नोंदवले होते. या एकतर्फी विजयामुळे UAEने स्पर्धेत दमदार सुरुवात केली आहे. संघाचा नेट रनरेट तब्बल +34.650 इतका झाला आहे. यासह गुणतालिकेत UAE अव्वल स्थानी पोहोचली आहे. त्यामुळे आशिया कप पात्रता स्पर्धेत UAEचा दावा अधिक मजबूत झाला आहे.



# टीम इंडियाला मोठा धक्का! मोहम्मद सिराज कसोटीला मुकणार ?

## गिलच्या लाडक्या गोलंदाजाला मिळू शकते सुवर्णसंधी...

■ मुंबई वृत्तसंस्था :

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात 6 जूनपासून न्यू चंदीगड येथे होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यापूर्वी टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतीय संघाच्या गोलंदाजीला मोठा फटका बसण्याची शक्यता मानली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आयपीएल 2026 च्या अंतिम सामन्यादरम्यान सिराजला शारीरिक त्रास जाणवला होता. त्यानंतर त्याच्यावर फिजिओथेरपीही करण्यात आली होती. वैद्यकीय पथक त्याच्या फिटनेसवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. पुढील 48 तासांत त्याच्या सहभागाबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असं म्हटलं जात आहे.

सिराज या कसोटीत खेळू शकला नाही, तर पंजाबचा युवा वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारला भारतीय कसोटी संघात पदार्पणाची संधी दिली जाऊ शकते. मुख्य निवडकर्त्यांनी त्याला संघात स्थान दिल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. आता सिराज बाहेर पडल्यास प्रसिद्ध कृष्णासोबत नवीन चेंडूची जबाबदारी गुरनूर ब्रारकडे येऊ शकते अशी चर्चा आहे.

आकिब नबी संघात पण... रणजी ट्रॉफीमध्ये 60 विकेट्स घेत चर्चेत आलेला जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबी सध्या भारतीय संघासोबत राखीव खेळाडू म्हणून आहे. मात्र त्याचा मुख्य संघात समावेश नसून तो नेट गोलंदाज म्हणून संघासोबत सराव करत आहे. त्याच्यासोबत गुर्जपनीत सिंह आणि प्रिन्स यादव यांनाही नेट गोलंदाज म्हणून संधी देण्यात आली आहे.

गुजरात टायटन्सकडून खेळताना मोहम्मद सिराजने आयपीएल 2026 मध्ये उत्कृष्ट गोलंदाजी केली होती. त्याने 17 सामन्यांत 19 विकेट्स घेत गुजरातचा दुसरा सर्वात यशस्वी गोलंदाज होण्याचा मान मिळवला. कगिसो रबाडानंतर सर्वाधिक विकेट्स घेणारा तो गुजरातचा गोलंदाज ठरला. यंदाच्या हंगामात त्याने सर्वाधिक 172 डॉट चेंडू टाकले आहेत.

# अफगाणिस्तान दौऱ्यापूर्वी टीम इंडियात मोठे बदल; टीम इंडियाला मिळाला नवा फिरकी गुरू !

■ मुंबई : वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट नियामक मंडळा द्वारा (बीसीसीआय) भारतीय पुरुष वरिष्ठ संघाच्या फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकपदी माजी क्रिकेटपटू साईराज बहुतुले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवारी (२ मे ) याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली. देशांतर्गत आणि फ्रँचायझी क्रिकेटमध्ये फिरकी गोलंदाजांना घडवण्याचा मोठा अनुभव असलेल्या बहुतुले यांच्या नियुक्तीमुळे भारतीय संघाच्या गोलंदाजी विभागाला अजून बळ मिळेल असं मानलं जात आहे.

बीसीसीआयने सोशल मिडीयद्वारे पोस्ट करीत याची माहिती दिली. साईराज बहुतुले यांनी अनेक युवा फिरकीपटूंना घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि तांत्रिक ज्ञान भारतीय संघासाठी फायदेशीर ठरेल, असा विश्वास मंडळाने व्यक्त केला आहे.

भारतीय संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये स्थान मिळाल्यानंतर बहुतुले यांनी आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, भारतीय पुरुष संघाच्या फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकपदी नियुक्ती होणे हा माझ्यासाठी मोठा सन्मनाची गोष्ट आहे. देशासाठी पुन्हा योगदान देण्याची संधी मिळाल्याने मी उत्साहित आहे, असे त्यांनी सांगितले.

मुंबईतून क्रिकेटची सुरुवात करणाऱ्या साईराज बहुतुले यांनी भारतासाठी 2 कसोटी आणि 8 एकदिवसीय सामने खेळले आहेत. मात्र त्यांची खरी ओळख देशांतर्गत क्रिकेटमधील चांगल्या कामगिरीवरुन केली जाते. बहुतुलेस यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १८८ सामने खेळले आहेत. मुंबई, महाराष्ट्र आणि विदर्भ संघांचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी 630 विकेट्स आणि ६१७६ धावा केल्या आहेत. विशेष, म्हणजे बहुतुले सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळे यांच्यासोबतही खेळले आहेत. अष्टपैलू खेळाडू म्हणून त्यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये मोठा मोठी कामगिरी केली आहे. खेळाडू म्हणून निवृत्तीनंतर बहुतुले यांनी प्रशिक्षक म्हणूनही आपली छाप पाडली आहे .विदर्भ, केरळ, गुजरात आणि बंगाल संघांचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम केल्याचा त्यांना अनुभव आहे. IPL मध्येही राजस्थान रॉयल्स आणि पंजाब किंग्सचे स्पिन बॉलिंग कोच म्हणून त्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रशिक्षक म्हणून त्यांचे करियर यशस्वी ठरले आहे.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# मागच्या वर्षीची अतिवृष्टीची मदत नाही, पीकविमा नाही; यंदा तर दुष्काळी परिस्थिती!

## मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा वाली कोण?

■ परळी वैजनाथ

मराठवाडा म्हटले की डोळ्यासमोर येते ती दुष्काळाची छाया, पाण्यासाठीची वणवण आणि निसर्गाशी दोन हात करत जगणारा शेतकरी. मात्र गेल्या काही वर्षांत मराठवाड्याच्या शेतकऱ्याच्या संकटाचे स्वरूपच बदलले आहे. कधी पावसाचा थेंब नाही, तर कधी एकाच दिवसात आभाळ फाटल्यासारखा पाऊस. कधी पिके उभी राहतात, तर कधी काढणीच्या तोंडावर पावसाने ती आडवी होतात. आणि निसर्गाने साथ दिलीच तर बाजारपेठ शेतकऱ्याला साथ देत नाही. म्हणूनच आज मराठवाड्यातील शेतकऱ्याच्या मनात एकच प्रश्न घोंगावत आहे. मागच्या वर्षी अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या पिकांची मदत अजूनही पूर्णपणे मिळालेली नाही, तर यंदा दुष्काळी परिस्थितीशी सामना करायचा कसा? आणि या शेतकऱ्यांचा वाली कोण ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



### कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ; संकट मात्र कायम

मराठवाड्याच्या शेतीसमोर निसर्गाचे मोठे आव्हान आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीत पावसाचे प्रमाण, वेळ आणि वितरण यावर संपूर्ण शेतीचे गणित अवलंबून असते. पाऊस उशिरा आला तर पेरणीचे गणित बिघडते; वेळेवर आला तर आशा निर्माण होते; आणि अतिवृष्टी झाली तर हातातोंडाशी आलेले पीक वाहून जाते. मागील वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील मोठ्या क्षेत्रावरील शेतीचे नुकसान झाले. शासनाच्या माहितीनुसार 2025-26 मध्ये महाराष्ट्रातील 75.42 लाख हेक्टर शेती क्षेत्राला जल-हवामानशास्त्रीय आपत्तींचा फटका बसला. कागदावर नुकसानभरपाईच्या घोषणा होतात, पंचनामे होतात, प्रस्ताव जातात, मंजुरी मिळते; परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या खात्यात मदत पोहोचण्यास विलंब झाला तर त्याचा उपयोग किती? संकटाच्या काळात शेतकऱ्याला तातडीची मदत हवी असते. महिन्यांनी किंवा वर्षांनी मिळणारी मदत ही त्याच्या तत्कालीन गरजा भागवू शकत नाही.

### मदतीच्या प्रतीक्षेत शेतकरी आणि नव्या हंगामाचे संकट

एकीकडे मागील नुकसानीची भरपाई, पीकविमा, पंचनामे आणि विविध शासकीय मदतीची प्रतीक्षा; तर दुसरीकडे नव्या हंगामासाठी बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी, डिझेल, वीज आणि पाण्याचा खर्च. शेतकऱ्याने पैसा आणायचा कुठून? शेतीची सुरुवातच कर्जाने करावी लागते. पेरणीसाठी कर्ज, खतासाठी कर्ज, औषधांसाठी उधारी आणि उत्पादन बाजारात नेण्यासाठी पुन्हा खर्च. पीक चांगले आले तर भावाची चिंता आणि पीक खराब झाले तर उत्पन्नाची चिंता. त्यामुळे शेतकरी निसर्ग आणि बाजार या दोन्ही कात्रीत अडकला आहे.आजच्या परिस्थितीत शेतकरी फक्त पाऊस मागत नाही; तो स्थिर उत्पन्नाची हमी मागत आहे.

### पीक आले तर भाव नाही; भाव आला तर उत्पादन नाही!

मराठवाड्यातील शेतीचे हे सर्वात मोठे दुर्दैव आहे. शेतकऱ्याने मेहनत करून उत्पादन घेतले की बाजारपेठेत भाव कोसळतो. कांदा, सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा, मका, फळबागा किंवा भाजीपाला—पिकानुसार संकट वेगवेगळे असले तरी मुळात प्रश्न एकच आहे. उत्पादन खर्च वाढतोय; मात्र शेतीमालाचा भाव शेतकऱ्याच्या नियंत्रणात नाही. बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, मजुरी, सिंचन, यंत्रसामग्री आणि वाहतूक यांचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु शेतमाल विक्रीच्या वेळी शेतकऱ्याला आपला भाव ठरवता येत नाही. व्यापारी, बाजारपेठ, दलाल आणि मागणी-पुरवठ्याच्या गणितात शेतकऱ्याच्या श्रमाची किंमत अनेकदा हरवून जाते. म्हणूनच प्रश्न निर्माण होतो. शेतकरी उत्पादन करतो, पण उत्पादनाची किंमत ठरवण्याचा अधिकार त्याला कधी मिळणार ?

### मराठवाड्यातील ऊस उत्पादकांचाही वेगळा संघर्ष

मराठवाड्यात ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थितीही फारशी वेगळी नाही. ऊस हा ऊसच; मग पश्चिम महाराष्ट्रातील उसाला मिळणारा दर आणि मराठवाड्यातील शेतकऱ्याच्या उसाच्या व्यवहारातील अडचणी यात एवढी तफावत का?ऊस उत्पादनासाठी पाणी, खते, औषधे, मजुरी आणि तोडणी-वाहतुकीचा मोठा खर्च करावा लागतो. त्यानंतर कारखान्याकडे ऊस गेला की शेतकऱ्याला वेळेवर पेमेंट मिळण्याची अपेक्षा असते. एफआरपीच्या कायदेशीर चौकटीत शेतकऱ्याच्या उसाच्या पैशांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र प्रत्यक्षात देयके वेळेवर न मिळाल्यास शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक नियोजन कोलमडते. यंदाच्या हंगामातही ऊसदराचा प्रश्न ऐरणीवर येण्याची चिन्हे आहेत. ऊस उत्पादक शेतकरी संघटनांकडून दर आणि थकीत देयकांसाठी आंदोलनाची तयारी सुरू असल्याचे अलीकडील वृत्तांतून दिसून येते.

### सरकारच्या घोषणा आणि शेतकऱ्याच्या अपेक्षा

सरकारकडून विविध योजना जाहीर होतात. पीकविमा, नुकसानभरपाई, कर्जसवलत, अनुदान, बाजारहस्तक्षेप, हमीभाव अशा अनेक योजनांची यादी मोठी आहे. महाराष्ट्राच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या माहितीनुसार नैसर्गिक आपत्तीतील पीक नुकसानीसाठी निश्चित निकषांनुसार मदत देण्याची व्यवस्था आहे आणि पंचनामा, तहसील स्तरावरील नोंद, जिल्हास्तरीय प्रस्ताव, मंजुरी, ई-केवायसी आणि डीबीटी अशा टप्प्यांतून मदत दिली जाते. मात्र शेतकऱ्याचा प्रश्न योजनांची संख्या किती आहे हा नाही; योजना त्याच्यापर्यंत वेळेत पोहोचते का ? हा आहे.पंचनामा झाला म्हणजे प्रश्न संपला असे नाही. मंजुरी झाली म्हणजे मदत मिळाली असे नाही. आणि मदत मिळाली म्हणजे शेतकऱ्याचे नुकसान भरून निघाले असेही नाही.

### पीकविमा : शेतकऱ्याचा आधार की कागदोपत्री प्रक्रिया?

पीकविमा ही संकल्पना शेतकऱ्याला नैसर्गिक आपत्तीपासून आर्थिक संरक्षण देण्यासाठी आहे. परंतु प्रत्यक्षात अनेकदा नुकसानभरपाईची प्रक्रिया, नुकसान नोंदविणे, तांत्रिक मूल्यांकन, पात्रता आणि दावा निकाली काढण्याच्या प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम असतो. नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्याला कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, त्याच्या शेतातील नुकसानीची नोंद तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तातडीने व्हावी आणि पात्र रक्कम थेट खात्यावर जमा व्हावी, अशी पारदर्शक व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज आहे. पाणी नसल्यामुळे पीक गेले तर शेतकऱ्याचे उत्पन्न थांबते. उत्पन्न थांबले की कर्जाची परतफेड थांबते. कर्ज थांबले की पुढील हंगामाची तयारी अडते. पशुधन असेल तर चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो. रोजगारासाठी तरुण शहरांकडे जातात. अशा प्रकारे दुष्काळाचा फटका संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसतो. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत सरकारने केवळ टँकर किंवा चारा छावण्यांपुरते मर्यादित न राहता पीक नियोजन, पाणी व्यवस्थापन, रोजगार, पशुधन संरक्षण, कर्ज पुनर्गठन आणि शेतमाल बाजारपेठ या सर्व बाबींचा एकत्रित विचार करणे गरजेचे आहे.

### शेतकऱ्याला दया नको; न्याय हवा

शेतकरी हा मदतीचा कायमचा याचक नाही. तो देशाच्या अन्नव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. शहरातील माणसाच्या ताटात अन्न पोहोचविण्यासाठी तो उन्हातान्हात शेतात राबतो. त्याच्या श्रमावर बाजारपेठ उभी आहे, प्रक्रिया उद्योग उभे आहेत, वाहतूक व्यवस्था चालते आणि ग्रामीण अर्थव्यवस्था फिरते. म्हणून शेतकऱ्याला केवळ नुकसानभरपाई देऊन सरकारची जबाबदारी संपत नाही. त्याला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव, वेळेवर पेमेंट, प्रभावी पीकविमा, आपत्तीच्या वेळी तातडीची मदत, सिंचनाची शाश्वत व्यवस्था आणि बाजारपेठेतील संरक्षण मिळणे आवश्यक आहे.

“ त्याचबरोबर शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर दर मिळण्यासाठी ठोस बाजारव्यवस्था उभी करावी. ऊस उत्पादकांचे देयके वेळेवर मिळतील याची खात्री करावी. पाण्याचे नियोजन, सिंचन, जलसंधारण आणि पीक विविधीकरणासाठी दीर्घकालीन आराखडा तयार करावा. कारण शेतकरी संकटात असताना केवळ घोषणा पुरेशा नाहीत; प्रत्यक्ष मदत, योग्य दर आणि विश्वासाची गरज आहे. मराठवाड्यातील शेतकरी आजही मेहनत करण्यास तयार आहे. त्याला भीक नको, दया नको. त्याला आपल्या घामाची योग्य किंमत हवी आहे. त्याला निसर्गाच्या लहरीपणापासून आणि बाजारपेठेच्या अनिश्चिततेपासून संरक्षण हवे आहे. आणि म्हणूनच आज मराठवाड्याच्या शेतकऱ्याचा हा सवाल सत्तेच्या दरबारापर्यंत पोहोचला पाहिजे.

— **प्रा. प्रविण फुटके,** परळी वैजनाथ

### मराठवाड्यासाठी स्वतंत्र कृषी धोरणाची गरज

मराठवाड्याची भौगोलिक आणि हवामानाची परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रापेक्षा वेगळी आहे. त्यामुळे एकाच धोरणाने संपूर्ण महाराष्ट्रातील शेतीचे प्रश्न सुटणार नाहीत. मराठवाड्यासाठी दीर्घकालीन कृषी धोरण आवश्यक आहे. जलसंधारण, नदीजोड, शेततळे, सूक्ष्म सिंचन, सौरऊर्जा, पीक विविधीकरण, कमी पाण्यात येणारी पिके, प्रक्रिया उद्योग, शीतगृह व्यवस्था, साठवणूक केंद्रे आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना बळकटी देणे या उपायांकडे गांभीर्याने पाहावे लागेल. पाऊस पडला की पूर आणि पाऊस नाही पडला की दुष्काळ, या दुष्टचक्रातून मराठवाड्याला बाहेर काढण्यासाठी दीर्घकालीन जलव्यवस्थापन हाच मूलभूत उपाय आहे.

### शेतकऱ्याच्या मुलांचे भविष्यही धोक्यात

शेतीतून उत्पन्न मिळाले नाही तर त्याचा परिणाम फक्त शेतकऱ्यावर होत नाही. त्याच्या मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि भविष्यातील संधींवरही परिणाम होतो. आज अनेक शेतकरी आपल्या मुलांना शहरात शिक्षणासाठी पाठवतात. त्यासाठी शेती विकण्याची किंवा कर्ज घेण्याची वेळ येते. शेतीतून नियमित उत्पन्न मिळाले तर ग्रामीण भागातील तरुणांना शेतीतच आधुनिक व्यवसाय उभा करता येईल. म्हणून शेतकऱ्याला वाचवणे म्हणजे केवळ एक कुटुंब वाचवणे नव्हे; ग्रामीण महाराष्ट्राचे भविष्य वाचवणे होय.

### आज मराठवाड्यातील शेतकऱ्यापुढे प्रश्न आहे—उद्या काय?

मागील वर्षी अतिवृष्टीने नुकसान झाले. मदतीची प्रतीक्षा सुरू राहिली. आता यंदा पाऊस कमी पडला तर पुन्हा दुष्काळाचे संकट. आणि समजा पाऊस चांगला पडला तर बाजारभावाचा प्रश्न. म्हणजे कोणत्याही परिस्थितीत शेतकरीच अडचणीत! पाऊस पडला तर नुकसान, पाऊस नाही पडला तर नुकसान; पीक आले तर भाव नाही आणि भाव मिळाला तर उत्पादन नाही—मग शेतकऱ्याने जगायचे तरी कसे? हा प्रश्न केवळ मराठवाड्यातील शेतकऱ्याचा नाही. हा राज्याच्या कृषी धोरणासमोर उभा ठाकलेला प्रश्न आहे.

सरकारने तातडीने मागील नैसर्गिक आपत्तीतील प्रलंबित मदतीचा आढावा घ्यावा. पात्र शेतकऱ्यांना मदत वेळेत मिळते आहे का, याची गावनिहाय आणि तालुकानिहाय माहिती सार्वजनिक करावी. पीकविमा दावे तातडीने निकाली काढावेत. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यास त्यासाठी आगाऊ नियोजन करावे.

# ‘वसुधैव कुटुंबकम्’ हाच आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा पाया

## ‘आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय’ परिसंवादातील सर्वच तज्ज्ञ परीसंवादकांचा सूर

■ नाशिक वृत्तसंस्था

दि. १५ सप्टेंबर रोजी जगभर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडिओवर ‘आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय’ या विषयावर ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे आयोजित हे २४ वे ज्ञानसत्र दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. परिसंवादातील तज्ज्ञांनी ‘वसुधैव कुटुंबकम्’ ही संकल्पना आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा महत्त्वपूर्ण पाया असल्याचे प्रतिपादन केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार या ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी ज्ञानसत्राचे समन्वयन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.






परिसंवादात लोकशाहीची जागतिक संकल्पना, दक्षिण आशियातील लोकशाहीची वाटचाल, विविधता, नागरिकांचा सहभाग, विरोधी पक्षांची भूमिका तसेच लोकशाहीसमोरील समकालीन आव्हाने यांवर चर्चा करण्यात आली. लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नसून समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, संवाद, सहअस्तित्व आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित व्यापक व्यवस्था असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी ‘लोकशाहीची दक्षिण आशियाई जडणघडण : सार्क देशांची वाटचाल, विविधता आणि आव्हाने तसेच विरोधी पक्षांची भूमिका’ या विषयावर विचार मांडले. दक्षिण आशियातील विविध देशांतील लोकशाही संस्थांची वाटचाल, सामाजिक-सांस्कृतिक विविधता, नागरिकांचा सहभाग आणि विरोधी पक्षांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. द्वितीय परिसंवादक प्रा. सुजाता मोरे यांनी ‘भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता’ या विषयावर सविस्तर विवेचन केले. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग, सार्वजनिक प्रश्नांविषयीची जागरूकता आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्यांचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. पर्यटनशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक सहभागाच्या विविध पैलूंवरही त्यांनी प्रकाश टाकला.

तिसरे परिसंवादक प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी ‘अमेरिकन व भारतीय लोकशाहीचा तुलनात्मक आढावा’ घेताना दोन्ही देशांच्या लोकशाही व्यवस्थांची वैशिष्ट्ये आणि संस्थात्मक रचनेचे विवेचन केले. यानंतर त्यांनी ‘पालक लोकशाहीचे’ हे समयोचित काव्य सादर केले. या ज्ञानसत्राचा लाभ अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक आणि नागरिकांना घेता यावा, यासाठी कार्यक्रम विद्यापीठाच्या https://avc.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख श्री. धनंजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर व श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक सहकार्य केले.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शुक्रवार 18 सप्टेंबर 2026



# परळीतील गुन्हेगारी संपणारच नाही का...?

## गुटखा मटका रेती राख हे प्रत्येक गुन्ह्यामागील कारण; परळीतील तरुणाची लातूरमध्ये निर्घृण हत्या हत्येपूर्वीचा CCTV व्हिडिओ व्हायरल

**लातूर (वृत्त)**

**वाळू व्यवसायातील जुन्या आर्थिक व्यवहाराच्या वादातून परळी येथील एका ३५ वर्षीय तरुणाची लातूर शहरातील हॉटेल आमेर परिसरात धारदार शस्त्राने आणि फरशीने मारहाण करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना १६ सप्टेंबर रोजी रात्री घडली. या घटनेने परळी आणि लातूर परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, हत्येपूर्वीचा CCTV व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने या प्रकरणाची चर्चा अधिकच रंगली आहे. मृत तरुणाचे नाव शेख मन्सूर अली शेख लायक अली (वय ३५, रा. उसिफिया कॉलनी, परळी) असे आहे. या प्रकरणात परळीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नगरसेवक अलताफ खान सरदार खान पठाण यांच्यासह खालेद हमीद शेख आणि उमर महेबूब शेख या तिघांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे, लातूर येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



### बिदरकडे जात असताना लातूरमध्ये थांबले

**पोलिसांत दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, मजहरखान नादरखान पठाण (वय ४३, रा. मलिकपुरा, परळी) हे त्यांचे मित्र शेख मन्सूर अली आणि शेख सत्तार शेख जब्बार यांच्यासोबत इनोवा कारने बिदरकडे जात होते. प्रवासादरम्यान १६ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास जेवणासाठी ते लातूर शहरातील हॉटेल आमेर येथे थांबले. याच ठिकाणी परळीतील अलताफ खान सरदार खान पठाण, खालेद हमीद शेख आणि उमर महेबूब शेख हे आधीपासून उपस्थित असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.**

### १० लाखांच्या व्यवहारावरून वाद

**हॉटेलमध्ये वाळू व्यवसायातील सुमारे १० लाख रुपयांच्या जुन्या आर्थिक व्यवहारावरून शेख मन्सूर यांच्यासोबत वाद झाल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. हा वाद वाढल्यानंतर संबंधित सर्वजण हॉटेलच्या बाहेर आले. त्यानंतर आरोपींनी फॉर्च्युनर कारमधून धारदार शस्त्रे बाहेर काढून शेख मन्सूर यांच्यावर हल्ला केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.**

### कोयता, चाकू आणि फरशीने हल्ल्याचा आरोप

फिर्यादीतील माहितीनुसार, अलताफ खान पठाण याने कोयत्याने मानेवर वार केल्याचा, तर उमर महेबूब शेख याने चाकूने छातीसह शरीरावर वार केल्याचा आरोप आहे. तसेच खालेद हमीद शेख याने फरशीने डोक्यात मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. हल्ला सुरू असताना भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या मजहरखान पठाण यांच्यावरही हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. तर शेख सत्तार शेख जब्बार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

### हल्ल्यानंतर आरोपी फरार

हल्ल्यानंतर आरोपी फॉर्च्युनर कारमधून घटनास्थळावरून फरार झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. गंभीर जखमी अवस्थेत शेख मन्सूर यांना उपचारासाठी लातूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

### हत्येपूर्वीचा CCTV व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

या घटनेपूर्वीचा CCTV व्हिडिओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या फुटेजमध्ये घटनेपूर्वी संबंधित व्यक्तींच्या  ालचाली दिसत असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, व्हिडिओतील दृश्यांची अधिकृत पुष्टी पोलिसांकडून होणे बाकी आहे. या CCTV फुटेजसह घटनास्थळावरील इतर उपलब्ध पुरावे पोलिस तपासाचा महत्त्वाचा भाग ठरण्याची शक्यता आहे.

### तिघांविरुद्ध BNS अंतर्गत गुन्हा

या प्रकरणी मजहरखान नादरखान पठाण यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाणे, लातूर येथे अलताफ खान सरदार खान पठाण, खालेद हमीद शेख आणि उमर महेबूब शेख या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१), १०९(१) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांकडून घटनेमागील नेमका आर्थिक व्यवहार, हल्ल्याचे कारण, आरोपींची भूमिका, CCTV फुटेज आणि इतर उपलब्ध पुरावे यांचा तपास केला जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक भालचंद्र पद्माकर तिडके करत आहेत.

## वाळू व्यवसायातील १० लाखांच्या जुन्या व्यवहाराच्या वादातून हल्ला धारदार शस्त्रांसह फरशीने मारहाण केल्याचा आरोप

## जिल्हास्तरीय वैचारिक लेख स्पर्धेत परळीच्या लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या लजिना शेख हिचा प्रथम क्रमांक

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**



अंबाजोगाई येथील खोलेश्वर महाविद्यालयातील इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन जिल्हास्तरीय वैचारिक लेख स्पर्धेत परळी येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला कनिष्ठ महाविद्यालयाची १२ वी कला शाखेची विद्यार्थिनी लजिना अमीर शेख हिने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजि त विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन लजिनाचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष डॉ. अतुलराव देशपांडे होते. तर प्रमुख उपस्थिती म्ह णू न केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा म हा विद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुल कर्णी, महाविद्यालय विकास समितीचे सद स्य भीमसेन शिंदे, सीडीसी अध्यक्ष डॉ. गोपाळ चौसाळकर, प्रभारी प्राचार्य डॉ. दीपक फुलारी, इतिहास विभागप्रमुख डॉ. मनि षा रोकडे आदींची उपस्थिती होती. याप्र संगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे का र्य कारी अभियंता गौरीशंकर स्वामी आणि उपअ भियंता गोविंद मुंडे हेदेखील आवर्जून उपस्थित होते. या जिल्हास्तरीय स्पर्धेत विविध महाविद्यालयां ती ल विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

## गणेश उत्सवाच्या काळात अखंडित व सुरळीत वीजपुरवठा ठेवा : हंसराज मोरे

**महागाव प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील काळी दौ परिसरात श्री गणेश उत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिमय व आनंदी वातावरणात साजरा होत आहे. गणेश मंडळांमध्ये लहान मुलांपासून तरुणांपर्यंत सर्वांचा मोठा उत्साह असून, विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उत्सवाच्या काळात वारंवार वीजपुरवठा खंडित होऊ नये तसेच अनावश्यक वीजखंडित टाळण्यात यावी, ही सर्व गणेश भक्तांच्या वतीने महाविद्यालयाच्या कनिष्ठ अभियंता यांना मागणी



करण्यात आली जेणेकरून सायंकाळच्या आरती, भजन, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर धार्मिक कार्यक्रमांच्या वेळी वीजपुरवठा सुरळीत राहिल्यास गणेश मंडळातील मुलांचा उत्साह आणखी वाढेल आणि उत्सवाचे वातावरण आनंदमय राहील.

# श्री.संत तुकाराम महाराज शिक्षक बचत गटाची आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

## संत तुकाराम महाराज  शिक्षक बचत गटाची पतसंस्थेकडे वाटचाल- एम पी सोळंके

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):**

थेंबे थेंबे साचे धन, सहकारातून वाढे धन या संकल्पनेतुन येथील शिक्षकांचे आर्थिक सक्षमीकरण यासोबतच परस्पर सहकार्य, विश्वास आणि बचतीची शिस्त जोपासणाऱ्या श्री. संत तुकाराम महाराज शिक्षक बचत गट, अंबाजोगाईची आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा स्वामी विवेकानंद सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेचे सचिव एम.पी. सोळंके होते. प्रमुख पाहुणे म्हणून साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रामभाऊ पवार, भगवान दराडे मुख्य प्रवर्तक , विजय रापतवार अध्यक्ष शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण अंबाजोगाई  हे उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक बचत गटाचे प्रवर्तक विजय रापतवार  यांनी करून बचत गटाच्या कार्याची व उद्दिष्टांची माहिती उपस्थितांना दिली. यानंतर बचत गटाचे अध्यक्ष बाळासाहेब माने यांनी मागील वर्षातील आर्थिक व्यवहाराचा सविस्तर आढावा सभासदां समोर मांडला.

या सभेमध्ये बचत गटाच्या आर्थिक प्रगतीला चालना देणारे तसेच सभासदांना अधिकाधिक आर्थिक सुविधा उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. ज्यामध्ये  कर्ज मर्यादा ही रुपये २,००,००० वरून  रुपये २,५०,०००/- एवढी वाढवण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत सभासदांना आर्थिक मदत उपलब्ध व्हावी यासाठी रुपये १,००,००० बँकेत फिक्स्ड डिपॉझिट स्वरूपात ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. बचत गटाची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासाठी बचत गटाच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतांना २०२५-२६चे एकूण भाग भांडवल  २५,०७,६०० एवढे असून गटास एकूण निव्वळ नफा रुपये २,१३,६०० झाल्याचे  उपस्थित सभासदांच्या निदर्शनास आणून दिले .एकूण जमा शेअर्स  रुपये २२,९६,००० पैकी कर्ज वाटप हे १८,९०,००० एवढे झाले असून बँक खात्यावरील आजची जमा शिल्लक ही रुपये ६,१८,५५०  अशी आढून सभासदांना एकूण लाभांश वाटप २,००,९०० रुपये करण्यात आल्याचे याप्रसंगी नमूद करण्यात आले.




बाळासाहेब माने यांनी बचत गटाच्याविषयी सविस्तर माहिती देतांना  सभासदांच्या आर्थिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शिक्षक बचत गट हा केवळ आर्थिक व्यवहारांचा समूह नसून परस्पर विश्वास, सहकार्य आणि आर्थिक शिस्तीचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे रामभाऊ पवार यांनी संत तुकाराम महाराज बचत गटाच्या आर्थिक स्थिती बद्दल समाधान व्यक्त केले. सुयोग्य नियोजन व सभासदांची गटाप्रती आत्मीयता यामुळेचे हे सर्व शक्य झाल्याचे सांगून गटास शुभेच्छा दिल्या. भगवान दराडे यांनी शिक्षक बचत गटाच्या स्वतःच्या भांडवलावर होत असलेल्या प्रगतीचे कौतुक करत बचत गटाची वाटचाल ही सहकारकडून समृद्धीकडे  होत असल्याचे स्पष्ट केले. सभेचे अध्यक्ष एम.पी.सोळंके यांनी बचत गटाच्या उल्लेखनीय कार्याबद्दल पदाधिकारी व सभासदांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. संत तुकाराम महाराज शिक्षक बचत गटाची  पतसंस्थेच्या दिशेने वाटचाल होतांना दिसून येत असल्याने मार्मिक भाष्य करत भविष्यातही बचत गटाने अधिक सक्षमपणे प्रगती करावी अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. यावेळी बचत गटाचे सदस्य दत्ता देवकते यांना रोटरी क्लबचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल व सतीश चलबदे यांच्या सेवानिवृत्ती बद्दल त्यांचा  सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा होऊन सभासदांनी आपली मते व सूचना मांडल्या. उपस्थित मान्यवरांनी शिक्षक बचत गटाच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातही बचत गटाने अशीच प्रगती करावी अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू सरवदे यांनी केले. शेवटी  गोविंद यादव यांनी उपस्थित सर्व मान्यवर,पदाधिकारी, सभासदांचे आभार व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता केली. या वार्षिक सर्वसाधारण सभेत शिक्षक बचत गटाचे सर्व पदाधिकारी तथा शिक्षक बांधव उपस्थित होते.